।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ३ मे २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १८ वा


## जल जीवन मिशनला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ!

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश






सांगोला : ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्थेला गती देण्यासाठी केंद्र सरकारने जल जीवन मिशन (गगच्) या महत्त्वाकांक्षी योजनेची मुदत डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. जलसंपदा विषयक स्थायी समितीच्या १९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जल जीवन मिशन अंतर्गतील कामांच्या थकीत देयकांचा गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. त्याचबरोबर संसदेतील सभागृहात देखील ठेकेदार व अंमलबजावणी यंत्रणांना देयके वेळेत न मिळाल्याने कामांची गती मंदावत पाणीपुरवठा योजनांच्या कामांवर परिणाम होत असल्याचे त्यांनी केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

समितीसमोर सादर करण्यात आलेल्या उत्तरात केंद्र शासनाने स्पष्ट केले की, ‘जेजेएम २.०’ अंतर्गत योजनेची पुनर्रचना करण्यात आली असून ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रात संरचनात्मक सुधारणा करण्यावर भर दिला जाणार आहे. यासाठी वाढीव आर्थिक तरतूद करण्यात आली असून, केंद्राकडून राज्यांना अनुदान जेजेएम २.० च्या कार्यकारी मार्गदर्शक सूचनांनुसार वितरित केले जाईल.

दरम्यान, थकीत देयके लवकरात लवकर अदा करून सुरू असलेल्या कामांना गती देणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या या पाठपुराव्यामुळे व केंद्र सरकारने जलजीवन मिशनच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयामुळे देशातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांना नवसंजीवनी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## सांगोला तालुक्याचा बारावी निकाल ९२.५६ टक्के

सांगोला : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीचा निकाल काल शनिवार दि.०२ मे रोजी २०२६ रोजी दुपारी १ वाजता निकाल जाहीर करण्यात आला. यावर्षी सांगोला तालुक्याचा बारावीचा निकाल ९२.५६ टक्के लागला असून ३२ उच्च माध्यमिक कॉलेज पैकी फक्त२ कॉलेज चा निकाल शंभर टक्के लागला आहे.गेल्या वर्षीचा निकाल ९३.९९ टक्के लागला होता. यावर्षी तालुक्याचा निकाल कमी लागला आहे.

तालुक्यातील सर्व शाळांचा निकाल पुढीलप्रमाणे- सांगोला विद्यामंदिर सांगोलासायन्स ९८.०१ टक्के, आर्ट ९३.५७ टक्के, कॉमर्स ९९.१५ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल सांगोला- सायन्स ९२.२४ टक्के, आर्ट ७०.८७ टक्के, किमान कौशल्य ८८.३७ टक्के, फॅबटेक पब्लिक सांगोला- सायन्स ९६.५५ टक्के, जवळे विद्यालय- सायन्स ९५.१६ टक्के, आर्ट ५० टक्के, कॉमर्स ८५.३६ टक्के, श्रीधर कन्या नाझरा- आर्ट ९१.४२ टक्के, कॉमर्स ६६.६६ टक्के, श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल वाटंबरे- आर्ट ९२.३० टक्के , मेडशिंगी हायस्कूल- आर्ट ८८.८८ टक्के, स.शा.लिगाडे ज्यु.कॉलेज अकोला- सायन्स ९८.३० टक्के, सोनंद ज्यु कॉलेज-आर्ट ५७.८९ टक्के, श्री.शिवाजी विद्यालय महूद बु- सायन्स ९३.९३ टक्के, आर्ट ७३.७७ टक्के , विद्यामंदिर कोळा- सायन्स-९६.४२ टक्के, आर्ट ९८.१४ टक्के, सावित्रीबाई फुले सोनंद- सायन्स ९५.०८ टक्के, आर्ट ५० टक्के, नाझरा विद्यामंदिर- आर्ट ९६.४२ टक्के, कॉमर्स ९१.६६ टक्के, शिवणे उच्च माध्यमिक- सायन्स ९८.३३ टक्के, आर्ट ८६.४८ टक्के. श्रीराम हातीद- आर्ट १०० टक्के, अभिजीत कदम विद्यालय मेथवडे- आर्ट ९० टक्के, मॉडर्न घेरडीआर्ट ५३.१२ टक्के, वाढेगाव ज्यु.कॉलेज- आर्ट ८८.२३ टक्के, कै.पांडुरंग आबा भांबुरे आलेगावसायन्स ९८.३८ टक्के, आर्ट ९०.९० टक्के, विकास विद्यालय अजनाळे विद्यालय- सायन्स १०० टक्के, आर्ट ८१.४८ टक्के, हलदहिवडी विद्यालय- आर्ट ९६.६६ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल पाचेगाव बु - आर्ट ९३.३३ टक्के, जुनोनी विद्यालय - आर्ट ९७.८७ टक्के, विद्यामंदिर वाकी- सायन्स ९९.६८ टक्के. विद्यानिकेतन गौडवाडी- सायन्स १०० टक्के, आर्ट ९५.८३ %, बी.देसाई ज्यु.कॉलेज- सायन्स १०० टक्के, आर्ट ७५ टक्के, एखतपूर विद्यामंदिर ज्यु. कॉ. सायन्स ९८.३० टक्के, दिपक साळुंखे-पाटील सायन्स कॉलेज- सायन्स ९७.७६ टक्के, श्री.गुरुकुल राजुरी- सायन्स १०० टक्के, लक्ष्मीदेवी विद्यामंदिर -सायन्स ९८.७१ टक्के, फोनेक्स - सायन्स ९८.४२ टक्के, आर्ट १०० टक्के.

यावर्षी सांगोला तालुक्यामधून ४ हजार ४५६ विद्यार्थ्यांपैकी ४३८६ विद्यार्थी परीक्षेस बसले हाते.

यामध्ये डिस्टिक्शनमध्ये ३९९ विद्यार्थी, ग्रेड १ मध्ये १११६ विद्यार्थी, ग्रेड २ मध्ये १९९३ विद्यार्थी पास झाले असून पास ग्रेडमध्ये ५५२ विद्यार्थी असे एकूण ४ हजार ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजचे एच.एस.सी.बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश

## गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत स्वरदा वांगीकर पुणे बोर्डात प्रथम




सांगोला : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे बोर्डाकडून फेब्रु/मार्च,२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१२ वी परीक्षेचा निकाल शनिवार दि.२ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाला.सदर परीक्षेत सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज मधील इ.१२ वी शास्त्र शाखेतील विद्यार्थिनी स्वरदा वांगीकर हिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत बोर्डात प्रथम क्रमांक पटकाविला.तसेच कला, वाणिज्य शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले.

यामध्ये ज्युनिअर कॉलेज कला शाखा ९३.५७%, वाणिज्य शाखा ९९.१५ % तर शास्त्र शाखेचा निकाल ९८.०१% व ज्युनिअर कॉलेजचा एकूण निकाल ९७.५०% आहे. यामध्ये कला शाखा हर्षदा बाळासाहेब गेजगे,आरती महादेव गोडसे ८३.६७% प्रथम क्रमांक, विशाखा दादासाहेब सोनवणे ८३.१७% द्वितीय क्रमांक, अस्मिता राजेंद्र इंगोले ७९.८३ तृतीय क्रमांक,वाणिज्य शाखा लक्ष्मी शशिकांत गोडसे ९०.३३% प्रथम क्रमांक, आर्या किरण घोंगडे, वैष्णवी बाजीराव रणदिवे ९०.००% द्वितीय क्रमांक, मृणाली अशोक लांडगे ८८.३३% तृतीय क्रमांक , शास्त्र शाखा ऋचाश्री भाऊसाहेब चव्हाण ८६.६७% प्रथम क्रमांक, स्वरदा श्रीपाद वांगीकर ८६.५०% द्वितीय क्रमांक तर धीरज संजयकुमार जगताप ८५.०० % गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ड विजयसिंह चव्हाण, सचिव म. शं. घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, संस्था कार्यकारिणी सदस्य शीलाकाकी झपके,विश्वेश झपके,सर्व संस्था सदस्य, प्राचार्य बिभिषण माने, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप,उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे , पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, काकासो नरूटे, उत्तम सरगर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सदर निकाल जाहीर झाल्यानंतर सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके व सचिव म.शं घोंगडे यांचे शुभहस्ते व प्राचार्य बिभिषण माने, उपमुख्याध्यापिक चारूदत्त जगताप,उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे,पर्यवेक्षक प्रदीप धुकटे,काकासो नरूटे,उत्तम सरगर व ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना अभिनंदन पत्र देऊन त्यांचा पालकांसमवेत सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी विद्यार्थी हेच शिल्पकार आहेत असे सांगत स्थापनेपासून विद्यामंदिरची गुणवत्ता कायम राखत यावर्षी मिळविलेल्या उत्तुंग यशाबद्दल विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व पालकांचे अभिनंदन केले.व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या सत्काराबद्दल पालक व विद्यार्थ्यांनी संस्था, शाळा व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# मुक्त विचार

## विचारधन



'क्रोध पाळणे हे गरम कोळसा इतरांच्या अंगावर फेकण्यासाठी हातात धरल्याप्रमाणे आहे, यामुळे आपला हातही भाजतो.

-भगवान गौतम बुध्द

## भगवान बुद्ध : करुणा, प्रज्ञा आणि समतेचा शाश्वत मार्ग

भारतीय संस्कृतीच्या विशाल परंपरेत अनेक महामानवांनी मानवतेला दिशा दिली; परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे विचार काळाच्या सीमाही ओलांडतात. भगवान गौतम बुद्ध हे असेच विश्वमानव होते. त्यांनी केवळ एका धर्माची स्थापना केली नाही, तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा नवा मार्ग दिला. बुद्ध जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नाही; तो करुणा, विवेक, समता आणि शांततेच्या मूल्यांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. आज जग हिंसा, असहिष्णुता, विषमता आणि मानसिक अस्थिरतेच्या छायेत उभे असताना बुद्धांचे विचार अधिकच तेजस्वी वाटतात. सहाव्या शतकात कपिलवस्तूच्या राजघराण्यात सिद्धार्थ गौतमांचा जन्म झाला. वैभव, सत्ता आणि सुखसोयींच्या वातावरणात वाढलेला हा राजकुमार एका दिवशी वृद्धापकाळ, आजार, मृत्यू आणि संन्यासी या चार दृश्यांनी अंतर्मुख झाला. जीवन म्हणजे केवळ ऐश्वर्य नव्हे, तर दुःख, संघर्ष आणि अनिश्चिततेची शृंखला आहे, याची त्यांना जाणीव झाली. या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवाडा, सत्ता आणि सांसारिक मोह सोडला. ही घटना केवळ एका व्यक्तीचा त्याग नव्हती; ती मानवी इतिहासातील सत्यशोधाची क्रांतिकारी सुरुवात होती.

दीर्घ तपश्चर्या, चिंतन आणि आत्मसंवादानंतर बोधगया येथे पिंपळवृक्षाखाली सिद्धार्थांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' झाले, जागृत झालेले. त्यांनी जगाला सांगितले की दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा निरोध शक्य आहे आणि त्यासाठी मार्गही आहे. ही चार आर्यसत्ये मानवी जीवनाचे वास्तववादी विश्लेषण आहेत. बुद्धांनी दुःख नाकारले नाही, तर त्यावर उपाय सुचवला. म्हणूनच त्यांचे तत्त्वज्ञान निराशेचे नव्हे, तर आशेचे आहे. बुद्धांनी सांगितलेला अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयास, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी. हा मार्ग केवळ धार्मिक साधनेसाठी नाही, तर संतुलित आणि नैतिक जीवनासाठी आहे. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जगात हा मार्ग अधिकच महत्त्वाचा ठरतो. माणूस बाहेरून प्रगत झाला आहे; पण आतून अस्थिर झाला आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान मनाला स्थैर्य देणारे आहे.

भगवान बुद्धांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी समतेचा ध्वज उंचावला. त्या काळातील वर्णव्यवस्था, कर्मकांड, जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व आणि सामाजिक विषमता यांना त्यांनी थेट आव्हान दिले. त्यांनी स्पष्ट सांगितले, माणूस जन्माने मोठा होत नाही; तो कर्माने मोठा होतो. त्यांच्या संघात सर्व जातींचे, सर्व स्तरांतील लोकांना समान प्रवेश होता. स्त्रियांनाही त्यांनी भिक्षुणी संघात स्थान दिले. हे त्या काळातील सामाजिक क्रांतीचे अद्वितीय उदाहरण होते. आज आपण संविधान, लोकशाही आणि समानतेबद्दल बोलतो; पण या मूल्यांची बीजे बुद्धांच्या विचारांत दिसतात. त्यांनी कोणालाही कमी लेखले नाही, कोणालाही देवत्व देऊन गुलाम केले नाही. त्यांनी माणसाला विचार करायला शिकवले. अंधश्रद्धेने स्वीकारू नका; तपासा, विचार करा आणि मग स्वीकारा, हा त्यांचा संदेश होता. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा हा मूलमंत्र आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

आजच्या समाजात धार्मिक उन्माद वाढताना दिसतो. श्रद्धेपेक्षा प्रदर्शन, अध्यात्मापेक्षा बाजारपेठ आणि धर्मापेक्षा द्वेष अधिक ठळकपणे समोर येतो. अशा वेळी बुद्धांची शिकवण आपल्याला संयम आणि विवेकाची आठवण करून देते. बुद्धांनी धर्माला भयाचे साधन बनवले नाही; त्यांनी धर्माला मुक्तीचा मार्ग बनवला. त्यांनी सांगितलेला धर्म म्हणजे करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि अहिंसा. बुद्धांचे करुणेचे तत्त्वज्ञान आजच्या जगासाठी अमृतासमान आहे. युद्धे, दहशतवाद, जातीय हिंसा, कौटुंबिक तणाव, नैराश्य, स्पर्धा आणि असुरक्षितता यांमुळे माणूस आतून तुटत चालला आहे. अशा वेळी दुसऱ्याच्या दुःखाशी एकरूप होणे, संवेदनशील राहणे आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे, ही बुद्धांची शिकवण जीवनदायी ठरते. मानसिक आरोग्याच्या संदर्भातही बुद्धांचे विचार महत्त्वाचे आहेत. आज जगभर चिंता, नैराश्य, तणाव आणि असमाधान वाढले आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि यश मिळूनही मन रिकामे वाटते. बुद्धांनी याचे कारण तृष्णा सांगितले. अमर्याद इच्छा, तुलना, लोभ आणि आसक्ती यामुळे मन अस्थिर होते. समाधान, सजगता आणि मध्यम मार्ग स्वीकारल्यास जीवन अधिक शांत होऊ शकते.

आधुनिक मानसशास्त्र आणि ध्यानपद्धतीत बुद्धांच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. बुद्धांचा मध्यम मार्ग हा आजच्या अतिरेकाच्या काळातील सर्वांत मोठा संदेश आहे. एका बाजूला अति भोगवाद, दुसऱ्या बाजूला अति नकारवाद; एका बाजूला अंधश्रद्धा, दुसऱ्या बाजूला संवेदनाहीनता; एका बाजूला संपत्तीची स्पर्धा, दुसऱ्या बाजूला नैतिक दिवाळखोरी. या टोकांच्या जगात संतुलन राखणे म्हणजेच बुद्धांचा मध्यम मार्ग. भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीवर बुद्धांचा मोठा प्रभाव आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धांच्या विचारांतून समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची आधुनिक मांडणी केली. लाखो वंचितांना मानवी सन्मानाचा मार्ग बुद्धधम्मातून मिळाला. म्हणूनच बुद्ध जयंती ही केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक मुक्तीची आठवणही आहे. पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार आधुनिक आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल दया बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद साधत जगण्याचा मार्ग दाखवला. आज हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण आणि संसाधनांची लूट यामुळे पृथ्वी संकटात आहे. लोभावर नियंत्रण आणि मर्यादित उपभोग ही बुद्धांची शिकवण पर्यावरणरक्षणासाठीही मार्गदर्शक आहे.

भगवान बुद्धांचे जीवन आपल्याला सांगते की, परिवर्तन बाहेरून नव्हे तर आतून सुरू होते. मन बदलले की समाज बदलतो. विचार बदलले की इतिहास बदलतो. करुणा जागी झाली की संघर्ष निवळतो. म्हणूनच बुद्ध आजही जिवंत आहेत ग्रंथांत नव्हे, तर प्रत्येक विवेकी कृतीत; मंदिरांत नव्हे, तर प्रत्येक दयाळू हृदयात. बुद्ध जयंतीनिमित्त आपण हा संकल्प करूया की, मतभेद असले तरी वैर नको, श्रद्धा असली तरी अंधत्व नको, प्रगती असली तरी अहंकार नको, संपत्ती असली तरी संवेदना हरवू नयेत. भगवान बुद्धांच्या २५८९ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! करुणा, प्रज्ञा आणि समतेचा त्यांचा शाश्वत प्रकाश आपल्या समाजाला नवी दिशा देवो, हीच मंगलकामना.

**-प्रविण बागडे,नागपूर**

## कामगार दिन : श्रमाच्या घामाला न्याय कधी मिळणार

मानवी संस्कृतीचा इतिहास जर नीट वाचला तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसते, या जगातील प्रत्येक उंच इमारतीच्या पायात कामगाराचा घाम मिसळलेला आहे. प्रत्येक कारखान्याच्या भिंतींवर श्रमिकांच्या हातांचे ठसे आहेत. प्रत्येक रस्त्याच्या डांबरीकरणात, प्रत्येक धरणाच्या उभारणीत, प्रत्येक रेल्वे मार्गाच्या लोखंडात आणि प्रत्येक शहराच्या विस्तारात कामगारांचे आयुष्य झिजलेले आहे. जगाला गती देणारा खरा चाक जर कोणाचा असेल, तर तो कामगाराचा आहे. म्हणूनच १ मे हा दिवस 'जागतिक कामगार दिन' म्हणून साजरा केला जातो. पण प्रश्न असा आहे की, हा दिवस केवळ शुभेच्छांचा आणि भाषणांचा राहिला आहे का? श्रमाचा सन्मान खऱ्या अर्थाने समाजाच्या आचरणात उतरला आहे का? कामगार दिनाची प्रेरणा अमेरिकेतील शिकागो येथे १८८६ साली झालेल्या ऐतिहासिक श्रमिक आंदोलनातून मिळाली. आठ तास काम, आठ तास विश्रांती आणि आठ तास वैयक्तिक जीवन, या मागणीसाठी हजारो कामगार रस्त्यावर उतरले. त्या संघर्षात अनेकांनी प्राण दिले. त्यांच्या बलिदानातून श्रमिक हक्कांची नवी पहाट उगवली. आज जगभर कामगार दिन साजरा होत असला, तरी त्या दिवसामागील रक्त, अश्रू आणि संघर्षाची कहाणी विसरून चालणार नाही.

भारतातील कामगार चळवळीचाही इतिहास तितकाच तेजस्वी आहे. गिरणगावातील कामगारांचे संघर्ष, रेल्वे कर्मचाऱ्यांची आंदोलने, शेतमजुरांच्या लढाया, बांधकाम मजुरांचे मोर्चे या साऱ्यांनी भारतीय लोकशाहीला सामाजिक न्यायाची धार दिली. आपल्या संविधानाने कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्याचे आश्वासन दिले. किमान वेतन, कामाचे तास, सुरक्षितता, संघटन स्वातंत्र्य, प्रसूती लाभ, निवृत्ती वेतन यांसारख्या अनेक संकल्पना श्रमिक चळवळीमुळे शक्य झाल्या. मात्र, आजच्या वास्तवाकडे पाहिले, तर प्रश्न अधिक गंभीर वाटतो. अर्थव्यवस्था वाढते आहे, उद्योग वाढत आहेत, शहरांचे विस्तार होत आहेत; पण कामगाराचे जीवन कितपत बदलले? अनेक ठिकाणी कंत्राटी पद्धतीच्या नावाखाली असुरक्षित रोजगार वाढला आहे. दिवसाला दहा-दहा तास काम करूनही पोट भरत नाही, अशी लाखो कुटुंबांची अवस्था आहे. कारखान्यातील कामगार असो, बांधकाम मजूर असो, सफाई कर्मचारी असो, शेतमजूर असो किंवा घरकाम करणाऱ्या महिला असोत, त्यांच्या श्रमाचे मोल अजूनही समाजाने पूर्ण मान्य केलेले नाही.

आजच्या डिजिटल युगात कामगारांचे रूप बदलले आहे. ॲपवर काम करणारे डिलिव्हरी बॉय, कॅब चालक, वेअरहाऊस कर्मचारी, कुरिअर सेवा देणारे युवक, डेटा एंट्री करणारे तरुण, कॉल सेंटर कर्मचारी हे सारे आधुनिक अर्थव्यवस्थेचे नवे कामगार आहेत. त्यांच्याकडे निश्चित कामाचे तास नाहीत, सामाजिक सुरक्षा नाही, उद्याची खात्री नाही. स्क्रीनवर दिसणाऱ्या सुविधांच्या मागे अनेक अदृश्य श्रमिकांचे कष्ट आहेत. आपण एका क्लिकवर जेवण मागवतो; पण ते वेळेत पोहोचवण्यासाठी उन्हात, पावसात, धुळीत धावणाऱ्या युवकाच्या आयुष्याचा विचार कितीदा करतो? कोरोना महामारीने जगाला एक गोष्ट शिकवली, कामगारांशिवाय समाज थांबतो. लॉकडाऊनच्या काळात हजारो स्थलांतरित कामगार पायी निघालेले दृश्य भारताने पाहिले. शहरांचे वैभव उभारणारे हातच शहरांत परके झाले होते.

महिलांच्या श्रमाचा प्रश्न तर अधिकच वेदनादायी आहे. घरकाम, शेतकाम, कारखान्यातील काम, बांधकाम मजुरी, सेवा क्षेत्रातील योगदान, स्त्रिया सर्वत्र आहेत; पण त्यांचा श्रम अनेकदा अदृश्य ठरतो. घरकामाला अजूनही 'काम' मानले जात नाही. समान कामासाठी समान वेतनाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, सन्मान आणि संधी या बाबतीत अजूनही मोठी दरी आहे. कामगार दिनी महिलांच्या श्रमाला न्याय देण्याचा संकल्प आवश्यक आहे. ग्रामीण भारतातील शेतमजूर आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांची अवस्था वेगळी नाही. दुष्काळ, कर्जबाजारीपणा, हंगामी रोजगार, कमी मजुरी, सामाजिक असुरक्षितता या प्रश्नांनी ते ग्रासलेले आहेत. शहरातील चमक आणि गावातील संघर्ष यामधील दरी अजूनही भरून निघालेली नाही. कामगार प्रश्न केवळ कारखान्यांपुरता मर्यादित नाही; तो शेतापासून शहरापर्यंत आणि बांधकामापासून आयटीपर्यंत विस्तारलेला आहे. कामगार दिन आपल्याला केवळ हक्कांची नव्हे, तर कर्तव्यांचीही आठवण करून देतो. उद्योगांनी कामगाराला खर्च समजू नये; तो उत्पादनाचा भागीदार आहे. सरकारने श्रमकायद्यांना कागदावर न ठेवता काटेकोर अंमलबजावणी करावी. समाजाने काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे सन्मानाने पाहावे. मुलांनी डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी होण्याची स्वप्ने पाहावीतच; पण श्रमाला कमीपणा समजण्याची मानसिकता मोडली पाहिजे.

कामगार हा दया मागणारा वर्ग नाही; तो न्याय मागणारा वर्ग आहे. त्याला सहानुभूती नव्हे, समान संधी हव्यात. त्याला टाळ्या नव्हे, हक्क हवेत. त्याला आश्वासने नव्हे, सुरक्षित भविष्य हवे आहे. श्रमाशिवाय संपत्ती निर्माण होत नाही, उत्पादन होत नाही, सेवा चालत नाही आणि राष्ट्र उभे राहत नाही. म्हणून श्रमिकांचा सन्मान हा उपकार नाही; तो समाजाचा नैतिक कर्तव्य आहे. १ मे च्या निमित्ताने आपण हा संकल्प करू या, श्रमाला प्रतिष्ठा देऊ, कामगाराला न्याय देऊ, कष्टकऱ्याच्या मुलांना शिक्षण देऊ, महिलांच्या श्रमाला मान्यता देऊ, असंघटित क्षेत्राला सुरक्षा देऊ आणि विकासाच्या केंद्रस्थानी माणसाला ठेवू. कारण शेवटी राष्ट्राची खरी ताकद शेअर बाजारात नसते, ती कारखान्यातील मशीनजवळ उभ्या कामगाराच्या हातात असते; ती शेतात वाकलेल्या मजुराच्या कण्यात असते; ती शहर घडवणाऱ्या बांधकाम कामगाराच्या घामात असते. जागतिक कामगार दिनानिमित्त सर्व श्रमिकांना मनःपूर्वक अभिवादन! त्यांच्या श्रमाचा सन्मान, त्यांच्या हक्कांचा विजय आणि त्यांच्या जीवनात मान-सन्मानाचा प्रकाश नांदो, हीच खरी शुभेच्छा!

**-प्रविण बागडे,नागपूर**

साप्ताहिक माणदेश वार्ता
हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-२७ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

## सांगोला नगरपरिषद अंतर्गत जनगणना २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण संपन्न

सांगोला : केंद्र शासनाने जनगणना २०२६-२७ ची घोषणा केली असून प्रथम टप्प्यांमध्ये घर यादी जनगणना ही दिनांक १६ मे ते १४ जून या दरम्यान करण्यात येणार आहे. याकरिता जनगणना सुरळीत पार पाडण्यासाठी सांगोला नगरपरिषदेने दिनांक २७ एप्रिल ते २९ एप्रिल या दरम्यान प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह या ठिकाणी आयोजित केले होते. सदर प्रशिक्षणामध्ये सर्व ८४ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

सदरच्या प्रशिक्षणामध्ये जनगणना मोबाईल ॲपच्या माध्यमातून कशा पद्धतीने करावयाचे आहे याबद्दल सविस्तर असे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये ६५ घर यादी गट नगर परिषदेच्या माध्यमातून तयार करण्यात आले असून प्रत्येक गटांमध्ये एक प्रगणक जनगणना करणार आहे. या प्रगणकांना तांत्रिक मदत करण्यासाठी ६ प्रगणक यावर एक सुपरवायझर यांचे नेमणूक करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामध्ये पहिल्या दिवशी जनगणना ओळख व जनगणना पार्श्वभूमी संदर्भित व्याख्या, घर यादी नकाशा, मोबाईल ॲपचा वापर इ. संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. दुसऱ्या दिवशी नागरिकांना विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची माहिती व पद्धत याबाबतचे सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. व तिसऱ्या दिवशी सर्व प्रगणक व सुपरवायझर यांना प्रत्यक्ष घरांची गणना कशा पद्धतीने करावयाची याबाबत प्रगणक व सुपरवायझर यांच्याकडून प्रायोगिक स्वरुपात शहरातील विविध भागातील घरांची जनगणना करण्यात आली.

यावेळी जनगणना चार्ज ऑफिसर तथा मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, डिशनल चार्ज ऑफिसर श्री सचिन पाडे, फिल्ड ट्रेनर श्री प्रभाकर कांबळे व श्री योगेश गंगाधरे यांनी प्रगणक व सुपरवायझर यांना प्रशिक्षण दिले.

यंदाची जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे जनगणना डिजिटल पद्धतीने करण्यात येत आहे. त्याचबरोबर स्वगणनाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला आपल्या कुटुंबाची जनगणना स्वतः करता येणार आहे. यासाठी नागरिकांना दि. १ मे ते दि. १५ मे च्या मध्यरात्री पर्यंत http://se.census.gov.in या वेबसाईटच्या माध्यमातून स्वगणना करता येईल. जणगणनेसाठी प्रगणक दि. १६ मे ते १४ जून यादरम्यान आपल्या घरी येऊन माहिती घेईल.

यावेळी नागरिकांनी स्वगणना केली असल्यास प्राप्त स्वगणना आय-डी प्रगणकास देऊन सहकार्य करावे असे जनगणना चार्ज ऑफिसर तथा मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले.

## सांगोला स्मशानभूमीत खिलार गाई व चाऱ्याची मागणी

### शहीद जवान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून नगराध्यक्ष आनंदा माने यांचे कडे निवेदनाद्वारे मागणी



सांगोला : सांगोला येथील शहीद जवान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने सांगोला नगरपरिषदेककडून स्मशानभूमीत खिलार गाई व चारा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. याबाबत संस्थेच्या वतीने नगराध्यक्ष आनंद भाऊ माने यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

सांगोला स्मशानभूमीत दर महिन्याला तिसऱ्या दिवशी (माती साकडणे) हा धार्मिक कार्यक्रम पार पडतो. पूर्वी या कार्यक्रमावेळी कावळ्यांना अन्न देण्याची प्रथा होती; मात्र सध्या कावळयांची संख्या कमी झाल्याने पर्याय म्हणून खिलार गाईला चारा देण्याची पद्धत सुरू करण्यात आली आहे. परंतु, स्मशानभूमीत गाईसाठी नियमित चाऱ्याची व्यवस्था नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कार्यक्रमासाठी येणाऱ्या नातेवाईकांचा वेळही मोठ्या प्रमाणात वाया जात असल्याचे संस्थेने नमूद केले आहे. पूर्वी येथे एक गाय ठेवण्यात आली होती; मात्र चाऱ्याअभावी ती परत देण्यात आल्याची माहितीही निवेदनात देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन स्मशानभूमी विकास कामांना प्राधान्य देत असल्याने, सांगोला स्मशानभूमीत खिलार गाय व तिच्या चाऱ्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी संस्थेने केली आहे. यामुळे तिसऱ्या दिवशीच्या विधीसाठी येणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचणार आहे. नगरपरिषदेकडून या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.


## जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ साठी ५ जून पर्यंत अर्ज करण्याबाबत पुनश्च आवाहन

सोलापूर : राष्ट्र व राज्याच्या उभारणीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून समाजातील विविध क्षेत्रात अनेक युवक व युवा संस्था उल्लेखनीय कार्य करीत आहेत. युवकांमधील सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे व त्यांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने राज्य शासनाच्या युवा धोरणांतर्गत शासन निर्णय दि. १२ जानेवारी २०१३ नुसार राज्य व जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०२५-२६ या वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातील समाजोपयोगी कार्य करणाऱ्या युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र प्राप्त अर्जांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी असल्यामुळे अधिक स्पर्धात्मक व गुणवत्तापूर्ण निवड प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी पुनश्च अर्ज मागविण्यात येत आहेत.

जिल्हास्तरावर १ युवक, १ युवती व १ नोंदणीकृत संस्थेला जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप व्यक्तींसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रुपये १० हजार रोख, तर संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रुपये ५० हजार रोख असे आहे. सदर पुरस्कारासाठी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य, दुर्बल घटकांसाठी योगदान, अनुसूचित जाती-जमाती व आदिवासी विकास, शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, क्रीडा, सांस्कृतिक व विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्र, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, नागरी वस्ती सुधारणा, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्यांवरील कार्याचा विचार करण्यात येणार आहे. अर्जदारांच्या दि. ०१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत मागील तीन वर्षांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येईल. पूर्वी अर्ज न केलेल्या पात्र युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांनी प्राधान्याने अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुकांनी परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि. ०५ जून २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त पात्र युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता



# सांगोला तालुक्यात उष्माघात प्रतिबंधासाठी ५३ ठिकाणी विशेष कक्ष सुरु-डॉ.संदिप देवकते

सांगोला : वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन आरोग्य विभागाने सांगोला तालुक्यात पूर्वतयारी केली आहे. नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि नागरी आरोग्य केंद्रांमध्ये एकूण ५३ ठिकाणी उष्माघात कक्ष सुरू करण्यात आल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप देवकते यांनी दिली.

सध्या सांगोला शहर व तालुक्यात उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे दिवसा रस्ते, बाजारपेठा आणि शासकीय कार्यालये तुलनेने ओस पडत असून अनेक नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग सतर्क झाला असून दरवर्षीप्रमाणे यंदाही आवश्यक उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

सांगोला तालुक्यातील ७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४३ उपकेंद्रे, २ नागरी आरोग्य केंद्रे तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मिळून एकूण ५३ ठिकाणी हे कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. सध्या तालुक्यात उष्माघाताचा एकही रुग्ण आढळलेला नसला तरी संभाव्य धोका लक्षात घेऊन प्रशासन सज्ज आहे. एखादा रुग्ण आढळल्यास १०८ रुग्णवाहिकेद्वारे तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा ग्रामीण रुग्णालयात हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

उष्माघाताची लक्षणे जसे की चक्कर येणे, डोकेदुखी, शरीराचे तापमान वाढणे किंवा त्वचा कोरडी पडणे जाणवल्यास विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्रातील उष्माघात कक्षात जाऊन तपासणी व उपचार घ्यावेत, असे आवाहन डॉ. संदिप देवकते यांनी केले आहे.

# डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयाचा दोन संस्थांबरोबर सामंजस्य करार

सांगोला : डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला व राष्ट्रीय पातळीवर विविध सायन्स व सामाजिक विषयांवर गेली ५० वर्षांपासून काम करणारी इंडियन वुमेन सायंटिस्ट असोसिएशन,शाखा कोल्हापूर, व महाराष्ट्र शासनाचा १ लाख रूपयांचा वनश्री पुरस्कार प्राप्त, पर्यावरण व इतर अनेक सामाजिक प्रश्नांवर गेली अनेक वर्षे कार्यरत कोल्हापूर गार्डन्स क्लब या दोन संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली व सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री. विठ्ठलराव शिंदे, संचालक डॉ. अशोक शिंदे, प्रा.दीपक खटकाळे, प्रा. जयंत जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

यासाठी इंडियन वुमेन सायंटिस्ट्स असोसिएशन च्या कन्व्हेनर डॉ. मंजिरी मोरे, कोल्हापूर गार्डन्स क्लब च्या अध्यक्ष पल्लवी कुलकर्णी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांनी स्वाक्षरी केल्या. या करारा अंतर्गत संशोधन, कॉन्फरन्स, वर्कशॉप, सेमिनार याबरोबरच पर्यावरण व इतर सामाजिक विषयांवरती एकत्रित काम करतील जेणेकरून त्याचा उपयोग महाविद्यालय, प्राध्यापक, विद्यार्थी व समाजातील इतर घटकांना निश्चितच होईल.

इंडियन वुमेन सायंटिस्ट्स असोसिएशन च्या माजी कन्व्हेनर व कोल्हापूर गार्डन्स क्लबच्या सदस्य डॉ. सीमा गायकवाड यांच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने हा सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा.मारूती हाके यांच्या सह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# फॅबटेक फार्मसी मध्ये थ्री डी प्रिंटिंग टेक्नॉलजी विषयावर एकदिवसीय कार्यशाळा




सांगोला : फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये औषध शोध व विकासातील आधुनिक तंत्रज्ञान या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. हि कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.शीतल कुमार झांबड (प्रतिष्ठित फार्मास्युटिकल संशोधक व औषध विकास तज्ञ, पुणे ) आणि श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, परसोडी चे प्राचार्य डॉ. रविंद्रकुमार बकाल उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शितल कुमार झांबड व डॉ. रविंद्रकुमार बकाल यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन व समन्वय ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समन्वयक डॉ. योगेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशाळेत त्यांनी औषध शोध प्रक्रियेतील औषध संशोधन आणि विकास, प्रीक्लिनिकल ते क्लिनिकल विकास तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. संजय बैस म्हणाले, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक विकासाला चालना देण्यासाठी फॅबटेक महाविद्यालय अशा कार्यशाळा आयोजित करीत आहे.

# सांगोला महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक माणदेश प्रकाशन संपन्न



सांगोला : सांगोला महाविद्यालयात १ मे २०२६ रोजी महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक माणदेशचे प्रकाशन संपन्न झाले. या प्रकाशन सोहळ्याचे उद्घाटन संस्था उपाध्यक्ष मा.श्री. प्रा पी. सी. झपके सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव मा.श्री साहेबराव ढेकळे, संस्था कार्यकारिणी सदस्य व माजी सचिव मा.श्री म. सि. झिरपे, संस्था कार्यकारिणी निमंत्रित सदस्य श्री सुरेश फुले, संस्था सदस्य मा.श्री. सु. ग. उकळे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, नियतकालिकाचे संपादक डॉ. जमीर तांबोळी व इतर मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक करत नियतकालिकातून व्यक्त होणाऱ्या विचारविश्वाचे महत्व अधोरेखित केले.

माणदेश नियतकालिक हे विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्यास चालना देणारे असून, त्यात शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक लेखांचा समावेश आहे. या प्रकाशन सोहळ्याचे संयोजन आणि नियोजन प्रभावीरीत्या पार पाडण्यात आले. माणदेश नियतकालीकेसाठी सहसंपादक डॉ. विधीन कांबळे, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. भारत पवार, प्रा. संतोष लोंढे, श्री. नरेंद्र पाटील, डॉ. अमोल पवार, डॉ. ओंकार घाडगे, प्रा. विशाल कुलकर्णी, प्राध्यापिका डॉ. भाग्यश्री पाटील, प्राध्यापिका कु. प्राप्ती लामगुंडे व कार्यालयीन प्र. अधीक्षक श्री. विलास माने यांनी परिश्रम घेतले. तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# न्यू इंग्लिश स्कूल, ज्युनि. कॉलेजची बारावी २०२६ च्या परीक्षेत उज्वल यशाची परंपरा











सांगोला : एच एस सी फेब्रुवारी मार्च २०२६ परीक्षेचा निकाल काल दुपारी बारा वाजता पुणे बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला. या परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेज सांगोला ने घवघवीत यश संपादन करत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. शास्त्र शाखेमधून एकूण ५१६ विद्यार्थी परीक्षेस बसलेल होते, यापैकी ४७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शास्त्र शाखेचा एकूण निकाल ९२.२५ टक्के लागला आहे.

शास्त्र शाखेमधून सागर गणपत फुले याने ९०.८३% गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक मिळवला तर कोमल नवनाथ केदार हिने ८७.१७% गुण प्राप्त करत द्वितीय क्रमांक मिळवला. संचित संजय शिंदे याने ८६.५०% गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक मिळविला.

कला शाखेचा निकाल ७०.८७% लागला असून कला शाखेमधून एकूण २०६ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कला शाखेचा एकूण निकाल ७०.८७ % लागला आहे. यामध्ये प्रज्ञा महादेव चंदनशिवे हिने ७९% गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक मिळविला. शोभना दत्तात्रय खरात हिने ७६.५०% गुण प्राप्त करत द्वितीय क्रमांक मिळविला. रोहिणी राजेंद्र होवाळ हिने ७४.५०% गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक मिळविला. व्यवसाय अभ्यासक्रम (२ कि.कौ.विभाग) विभागामधून ४३ विद्यार्थी परीक्षेत बसले होते, त्यापैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एकूण निकाल ८८.३७% लागला आहे. यामध्ये राहुल तम्मा येलपले याने ७०.६७% गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक मिळवला. यश विजय बनसोडे याने ६८.१७% गुणप्राप्त करत द्वितीय क्रमांक मिळविला. वंचिता महादेव कोळेकर हिने ६७% गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक मिळविला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ अनिकेत देशमुख, संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर, सर्व संस्था सदस्य, प्राचार्य प्रा.केशव माने, उपप्राचार्य प्रा संतोष जाधव, उपमुख्याध्यापिका सौ.वैशाली घोडके मॅडम, पर्यवेक्षक श्री.दशरथ जाधव सर, श्री.तात्यासो इमडे सर, श्री माणिकराव देशमुख सर यांच्यासह सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.